

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता

PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

आजचा सुविचार

स्वतःवर पूर्ण विश्वास ठेवा, जगातली कोणतीही ताकद तुम्हाला रोखू शकणार नाही.

छत्रपती संभाजीनगर ❀ गुरुवार दि. 26 नोव्हेंबर - 2026 ❀ वर्ष ;1 ❀ अंक ; 191 ❀ पाने .4 ❀ किमंत 4 रू ❀ email:hinduprakashvarta@gmail.com / Postal Regn ,No, ABD/551/2026/2028

थोडक्यात वार्ता

चार दिवसांपूर्वी जामीन, आज कोर्टाबाहेर हत्या!

पुणे : प्रतिनिधी

पुण्यात शिवाजी नगर परिसरात कोर्टाबाहेर भरदिवसा गोळीबाराची घडना घडली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून कोर्टाबाहेर गोळीबारासोबतच एकावर कोयत्यानेही हल्ला करण्यात आला. शिवाजीनगर कोर्टाबाहेरील परिसरात गेट नंबर 4 वर ही घटना घडली आहे. तीन- चार जणांच्या या हल्ल्यात एकाचा मृत्यू झाला. हल्लेखोर बंदूक फेकून तेथून फरार झाले आहेत. पोलिसांनी या घटनेनंतर परिसर सील केला आहे.मृत झालेल्या व्यक्तीचे नाव मंदार किवळे असून त्याची काही दिवसांपूर्वीच जामीनावरून सुटका झाली होती.ज्या हत्या प्रकरणात मंदार किवळे हा जामिनावर बाहेर आला होता, त्याच प्रकरणाशी त्याचे धागेदोरे जोडले गेले असल्याचे सांगितले जात आहे. कात्रज येथील संतोषनगर परिसरात जागेच्या वादातून शुभम सुभाष चव्हाण या तरुणाचा निर्घृण खून करण्यात आला होता. या प्रकरणात आंबेगाव पोलिसांनी सराईत गुन्हेगार अमर दिलीप साकोरे (वय 40) याच्यासह मंदार मारुती किवळे (वय 35), गिरीश सुभाष बाबरे (वय 25) आणि योगेश बाबुराव ढोरे (वय 35) या चौघांना अटक केली होती. या घटनेची पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मयत शुभम चव्हाण आणि मुख्य आरोपी अमर साकोरे



यांच्यात एका जागेवरून वाद सुरू होता. हत्येच्या दिवशी पहाटे शुभम कात्रजमधील संतोषनगर भागातून निघाला होता. त्यावेळी अमर साकोरे आणि मंदार किवळेसह त्याच्या इतर साथीदारांनी शुभमला अडवून शिवीगाळ व मारहाण सुरू केली. त्यावेळी आरोपींच्या तावडीतून वाचण्यासाठी शुभम पळाला असता, आरोपींनी त्याचा पाठलाग केला. त्यावेळी त्याला बांबूने बेदम मारहाण करण्यात आली आणि त्यानंतर डोक्यात दगड घालून त्याचा खून करण्यात आला होता.या खूनानंतर आंबेगाव पोलीस ठाण्याचे निरीक्षक शरद झिने यांच्या पथकाने मंदार किवळेसह चौघा आरोपींना अटक केली होती. गुप्त माहितीच्या आधारे कामठी बु. येथे छापा टाकून त्यांना अटक करण्यात आली होती. अलीकडेच 4 दिवसांपूर्वी मंदार किवळे जामिनावर बाहेर आला होता. त्यामुळे आता शिवाजीनगर कोर्टाबाहेर झालेल्या हल्ल्यात मंदारचा गेम झाल्याचे बोलले जात आहे, हा हल्ला जुन्या वैमनस्यातून आणि बदल्याच्या भावनेतूनच झाला असावा, या दिशेने पोलिसांनी तपास सुरू केला आहे. दरम्यान, पुणे पोलिसांनी दोन आरोपींची ओळख पटवली असून तपासासाठी पथके रवाना केली आहेत.

सुप्रिया सुळेंची मुख्यमंत्रीपदाच्या चर्चांवर मिश्कील प्रतिक्रिया

मुंबई : प्रतिनिधी



राष्ट्रवादी काँग्रेसचे (शप) अध्यक्ष शरद पवार यांनी भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीत (एनडीए) सहभागी होण्याच्या मोबदल्यात खासदार सुप्रिया सुळे यांना महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद देण्याचा प्रस्ताव मांडल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. या चर्चांवर सुप्रिया सुळे यांनी मिश्कील प्रतिक्रिया देत, 'गेल्या 12 वर्षांपासून माझा शपथविधी होत आहे. मला या कथांमध्ये रस नाही,' असे स्पष्ट केले. राजकीय पदांपेक्षा धोरणात्मक विषयांवर प्रश्न विचारले जावेत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनीही या चर्चांवर सावध भूमिका घेतलीसंसदेतील लोकसभा मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाला पाठिंबा देत शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस एनडीएमध्ये सहभागी होणार असल्याची चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरू आहे. या पार्श्वभूमीवर शरद पवार यांनी सुप्रिया सुळे यांच्यासाठी मुख्यमंत्रीपदाची मागणी केल्याचे बोलले जात आहे. बुधवारी साताऱ्यात प्रसारमाध्यमांनी सुप्रिया सुळे यांना याबाबत विचारणा केली. त्यावर त्यांनी, "कालपर्यंत मी केंद्रीय मंत्री होणार अशी चर्चा सुरू होती, आता मुख्यमंत्री होणार अशी चर्चा सुरू आहे. गेली 12 वर्षे माझा शपथविधी होतोय, माझ्यावर अन्याय करू नका. 2014 पासून मी मुख्यमंत्री होतेय. मला या कुठल्याही कथांमध्ये रस नाही. मला फक्त एका गोष्टीचे दुःख आहे की, ज्या धोरणनिर्मितीसाठी मी संसदेत निवडून गेले, त्याबद्दल गांभीर्याने कोणी विचारत नाही. मी सध्या चार संयुक्त संसदीय समित्यांवर (जेपीसी) आहे. देशाचे आर्थिक धोरण ठरवणाऱ्या वित्तीय समितीमध्येही माझा समावेश आहे. राष्ट्रीय पातळीवर काम करण्याची संधी मिळते, हे माझे भाग्य आहे. आहे. होऊ शकतो," अशी प्रतिक्रिया दिली

संविधान दिन विशेष



भारतामध्ये दरवर्षी **26 नोव्हेंबर** हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा केला जातो. भारतीय लोकशाहीच्या इतिहासातील हा अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे. भारताचे संविधान स्वीकारण्यात आलेल्या ऐतिहासिक दिवसाची आठवण म्हणून देशभरात संविधान दिन साजरा केला जातो. शाळा, महाविद्यालये, सरकारी कार्यालये आणि विविध संस्थांमध्ये या दिवशी संविधानाच्या महत्त्वाबाबत जनजागृती केली जाते. मात्र, आजच्या आधुनिक आणि डिजिटल युगातील Gen Z पिढीला भारतीय संविधानाबद्दल किती माहिती आहे? संविधानाने दिलेले मूलभूत अधिकार कोणते आहेत, याची जाणीव तरुणांना आहे का? हा प्रश्न या निमित्ताने महत्त्वाचा ठरतो.26 नोव्हेंबरलाच संविधान दिन का साजरा केला जातो?भारतीय संविधान सभेने 26 नोव्हेंबर 1949 रोजी देशाचे संविधान स्वीकारले. त्यानंतर 26 जानेवारी 1950 रोजी संविधानाची अंमलबजावणी सुरू झाली आणि भारत प्रजासत्ताक राष्ट्र बनला. त्यामुळे 26 नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून ओळखला जातो. 2015 मध्ये केंद्र सरकारने 26 नोव्हेंबर हा दिवस अधिकृतपणे संविधान दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. संविधानाचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहोचवणे आणि लोकांमध्ये घटनात्मक मूल्यांची जाणीव निर्माण करणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे.भारतीय संविधानाने नागरिकांना कोणते मूलभूत अधिकार दिले आहेतभारतीय संविधानाच्या भाग 3 मध्ये कलम 12 ते 35 दरम्यान मूलभूत अधिकारांची तरतूद करण्यात आली आहे. सध्या भारतीय नागरिकांना सहा प्रमुख प्रकारचे मूलभूत अधिकार दिले आहेत1. **समानतेचा अधिकार (कलम 14 ते 18)कायद्यासमोर सर्व नागरिक समान आहेत.** धर्म, जात, लिंग, जन्मस्थान यावरून भेदभाव करण्यास मनाई आहे. तसेच अस्पृश्यता नष्ट करणे आणि पदव्यांबाबतही संविधानात तरतुदी आहेत.2. स्वातंत्र्याचा अधिकार (कलम 19 ते 22) नागरिकांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य, शांततेने एकत्र येण्याचा अधिकार, संघटना स्थापन करण्याचा अधिकार, देशात मुक्तपणे फिरण्याचा अधिकार आणि व्यवसाय निवडण्याचे स्वातंत्र्य मिळते. यामध्ये वैयक्तिक स्वातंत्र्य आणि जीवनाच्या संरक्षणाचाही समावेश होतो.3. शोषणाविरुद्धचा अधिकार (कलम 23 आणि 24)मानवी तस्करी, सक्तीची मजुरी आणि काही प्रकारच्या बालमजुरीला प्रतिबंध करण्यात आला आहे. कोणत्याही व्यक्तीचे शोषण होऊ नये, हा या अधिकारामागील मुख्य उद्देश आहे.4. धर्मस्वातंत्र्याचा अधिकार (कलम 25 ते 28)प्रत्येक व्यक्तीला आपल्या इच्छेनुसार धर्म मानण्याचे, आचरण करण्याचे आणि धार्मिक विचारांचा प्रचार करण्याचे स्वातंत्र्य आहे. मात्र, हे स्वातंत्र्य सार्वजनिक सुव्यवस्था, नैतिकता आणि आरोग्याच्या अधीन आहे.5. सांस्कृतिक आणि शैक्षणिक अधिकार (कलम 29 आणि 30) देशातील विविध भाषा, लिपी आणि संस्कृतींचे संरक्षण करण्याचा अधिकार नागरिकांना आहे. **समजून घेणे का महत्त्वाचे?**आजची Gen Z पिढी सोशल मीडिया, इंटरनेट आणि डिजिटल माध्यमांशी जोडलेली आहे.

संजय राऊतांच्या लाचखोरीच्या आरोपांना मंत्री संजय शिरसाट यांचे प्रत्युत्तर

मुंबई: प्रतिनिधी



लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या नावाने लातूरमध्ये प्रशिक्षण केंद्र उभारण्यासाठी पाच कोटी रुपयांची लाच मागितल्याचा आरोप उबाठा गटाचे खासदार संजय राऊत यांनी सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांच्यावर केला आहे. या आरोपांना उत्तर देताना शिरसाट यांनी "मातोश्रीचा मागचा दरवाजा कशासाठी होता? त्या दरवाजातून टेम्पो आत कशासाठी यायचे?", असा सवाल करीत, गेल्या दोन वर्षांत मी 25 कोटी रुपयांचा एकही प्रस्ताव मंजूर केल्याचे दाखवून द्यावे, असे आव्हानही दिले. शिरसाट यांनी बुधवारी पत्रकार परिषद घेऊन राऊत यांच्या आरोपांवर भूमिका मांडली. ते म्हणाले, "मी गेल्या दोन वर्षांत 25 कोटी रुपयांचा एक तरी प्रस्ताव मंजूर केल्याचे दाखवा. मंत्री म्हणून मला 10 कोटी रुपयांपर्यंतचा प्रस्ताव मंजूर करण्याचा अधिकार आहे. त्यापेक्षा अधिक रकमेच्या प्रस्तावासाठी मुख्यमंत्र्यांची परवानगी घ्यावी लागते. उदगीरकर नावाच्या एका व्यक्तीने 25 कोटी रुपयांचा प्रस्ताव दिला होता. माझ्याकडे अनेक प्रस्ताव येत असतात. त्यातील काही फेटाळले जातात, तर काहींना मंजुरी दिली जाते. हा प्रक्रियेचा भाग आहे. मात्र, राऊत यांनी त्याचा संबंध साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्याशी जोडला. अण्णा भाऊ साठे यांचे योगदान मला माहीत आहे का, असा जावईशोधही त्यांनी लावला. त्या प्रकरणाचा अण्णा भाऊ साठे यांच्याशी संबंध काय? लेटरहेडवर महापुरुषांचे नाव लावायचे आणि काम झाले नाही की त्यांची बदनामी करायची, असा प्रकार सुरू असतो," असे शिरसाट म्हणाले."तुम्ही अण्णा भाऊ साठे यांचे नाव घेता. तुमच्या पक्षाच्या अध्यक्षांनी कधी त्यांच्या छायाचित्राला हार घातला का? हार घातल्याचा एखादा फोटो दाखवू शकता का? आम्हाला या भानगडीत तुम्ही खेचू शकत नाही. अण्णा भाऊ साठे आमच्यासाठी महत्त्वाचे आहेत. वाटेगावात जाऊन पाहा. इतिहासात एवढा मोठा पुतळा बसवला नसेल, असा पुतळा उभारण्यात येणार आहे. त्यासाठी 50 कोटी रुपये मंजूर केले आहेत. पाच एकर जागेत त्यांचे मोठे स्मारक उभारत आहोत. महाडला जाऊन पाहा. चवदार तळ्याचे सुशोभीकरण करीत असून त्यासाठी 90 कोटी रुपये खर्च करीत आहोत. डोळे उघडे ठेवून पाहा. महापुरुषांच्या छायाचित्रांचा वापर राजकारणासाठी करू नका. मजबुरी म्हणून तुम्हाला त्यांचे फोटो ठेवावे लागतात," असे ते म्हणाले.मंत्री शिरसाट म्हणाले, "उद्धव ठाकरेंना हे माहीत होते की, आमच्याकडे पैसे नाहीत, म्हणूनच त्यांनी आम्हाला मंत्री केले नाही. अपक्ष आमदार शंकर गडाख यांचा पक्षाशी संबंध नसतानाही त्यांना एका दिवसात मंत्री करण्यात आले. पक्षासाठी त्यांचे असे कोणते योगदान होते? आपल्या जवळच्या चौकडीतील लोक मंत्रिमंडळात कसे येतील, हेच उद्धव ठाकरे यांनी पाहिले. अनिल परब आणि सुभाष देसाई यांना मंत्रिमंडळात घेतले. मलिदा कसा खायचा, हेच त्यांचे लक्ष्य होते. मातोश्रीचा मागचा दरवाजा कशासाठी होता, हे सांगायला लावू नका. त्या मागच्या दरवाजातून टेम्पो कसे आत यायचे? आमच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप करता? आमच्याकडे पैसा नाही आणि आमची जात आडवी येते. तुमच्या मंत्रिमंडळात कोणता दलित मंत्री होता? बौद्ध समाजाचा कोणता मंत्री होता? अडीच वर्षे तुम्ही सत्तेत होता, त्या काळात कोणत्या दलिताला मंत्री केले, हे नाव सांगता येईल का?" असा सवाल त्यांनी केला.

हँडपंपद्वारे बाहेर काढली दारू



झाशी : प्रतिनिधी

: उत्तर प्रदेशातील झाशी येथे अवैध दारू उत्पादनाविरोधात कारवाई करताना उत्पादन शुल्क विभाग आणि पोलिसांनी एका अनोख्या पद्धतीचा पर्दाफाश केला आहे. एका घराच्या सिमेंटच्या व्हरांड्याखाली जमिनीमध्ये अवैध गावठी दारू साठवून ठेवण्यात आली होती. विशेष म्हणजे, ही दारू बाहेर काढण्यासाठी हँडपंपचा वापर केला जात होता. या संयुक्त कारवाईत 340 लिटर अवैध दारू जप्त करण्यात आली असून, 4,300 किलो लाहन नष्ट करण्यात आले आहे.अनेक ठिकाणी छापे; महिला आरोपीला अटकविशिष्ट माहितीच्या आधारे उत्पादन शुल्क विभाग आणि पोलिसांनी संयुक्तपणे अनेक ठिकाणी छापे टाकले. बरौरा क्रॉसिंग, सिमरावरी टेकड्या, बैडोरा, दखनेश्वर, डेरा पृथ्वीपूर नायकेडा, बुधपुरा, बामहौरौली, सकरार आणि अज्जार परिसरात ही कारवाई करण्यात आली.या कारवाईदरम्यान उत्पादन शुल्क कायद्यांतर्गत चार गुन्हे दाखल करण्यात आले. एका महिला आरोपीला अटक करून न्यायालयीन प्रक्रियेनंतर तुरुंगात पाठवण्यात आले. दुसऱ्या एका संयुक्त अटक करण्यात आली. यावेळी 1,000 लिटर आंबवण्याचे साहित्यही नष्ट करण्यात आले.दारूच्या दुकानांचीही अचानक तपासणीअवैध विक्री, भेसळ आणि जादा दर आकारण्याच्या तक्रारी तपासण्यासाठी विभागाने गावठी दारू आणि मिश्र दारूच्या दुकानांमध्ये अचानक तपासणी केली. दुकानांमधील नोंदवही आणि प्रत्यक्ष उपलब्ध साठ्याची पडताळणी करण्यात आली. तसेच सर्व विक्री पीओएस मशीनद्वारेच करण्याचे निर्देश दुकानदारांना देण्यात आले.अधिकृत दुकानांतूनच दारू खरेदी करण्याचे आवाहनागरिकांनी बेकायदेशीर दुकानांमधून दारू खरेदी करू नये, असे आवाहन अधिकाऱ्यांनी केले आहे.

एआरटीओ हेमाडे आत्महत्या प्रकरणाला नवे वळण ! मुलगा आणि सासऱ्याच्या कोठडीत वाढ

नाशिक : प्रतिनिधी



सेवानिवृत्त सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी (एआरटीओ) हेमंत गोविंद हेमाडे यांच्या आत्महत्या प्रकरणाचा तपास आता अधिक गुंतागुंतीच्या वळणावर पोहोचला आहे. सुरुवातीला मुलाचा विरोध आणि मालमत्तेच्या वादातून घडलेली घटना म्हणून पाहिल्या जाणाऱ्या या प्रकरणात आता कौटुंबिक संघर्षासोबतच व्यावसायिक संबंध आणि गेल्या चार वर्षांतील तक्रारींचीही पोलिसांकडून चौकशी केली जात आहे. याप्रकरणी अटक करण्यात आलेला मुलगा यश हेमाडे आणि त्याचा सासरा मल्लिकार्जुन उमदी यांच्या पोलीस कोठडीत २६ नोव्हेंबरपर्यंत वाढ करण्यात आली आहे.हेमाडे यांच्या आत्महत्येमागे गेल्या चार वर्षांपासून सुरू असलेला कौटुंबिक वाद, मालमत्तेवरील हक्काचा संघर्ष आणि शारीरिक व मानसिक छळ कारणीभूत असल्याचा आरोप त्यांच्या पत्नी योगिता यांनी तक्रारीत केला आहे. संशयित यश हा गॅस एजन्सीचा व्यवसाय सांभाळत असून, त्याचा सासरा उमदी खासगी व्यवसाय करतो. या व्यावसायिक पार्श्वभूमीवर मालमत्तेचा वाद नेमका कशामुळे निर्माण झाला आणि त्यातून हेमाडे यांच्यावर कशा प्रकारे दबाव आणला जात होता, याचा तपास पोलिस करत आहेत. दरम्यान, संशयित यशची पत्नी भाग्यश्री आणि हेमाडे यांची मुलगी प्रियंका कुणाल खोपकर या दोघींच्या अटकेसाठी गंगापूर पोलिसांनी दोन पथके रवाना केली आहेत. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक जमीर शेख करत आहेत.चार वर्षांपासून कौटुंबिक वाद, तक्रारींची मालिकाचेहेमाडे कुटुंबातील वादाची सुरुवात एप्रिल २०२२ मध्ये झाली होती. घरगुती वादातून मारहाण झाल्याप्रकरणी पहिला अदखलपात्र गुन्हा नोंदवण्यात आला होता. त्यानंतर जून २०२३ मध्ये तोडफोड आणि धमक्यांच्या तक्रारी करण्यात आल्या. ऑक्टोबर २०२३ मध्ये हेमाडे यांच्या दिवंगत पत्नी वैशाली यांच्या श्राद्धाच्या दिवशी झालेल्या वादातून मारहाण आणि विनयभंगाचा गुन्हा नोंदवण्यात आला होता. त्यानंतर मार्च २०२६ मध्ये घरात घुसून हल्ला केल्याचा आरोप करण्यात आला. या घटनेनंतर एप्रिल आणि मे २०२६ मध्येही अदखलपात्र गुन्ह्यांची नोंद झाली. वारंवार तक्रारी होऊनही परिस्थिती नियंत्रणात का आली नाही आणि संबंधित प्रकरणांमध्ये प्रतिबंधात्मक कारवाई का झाली नाही, याचाही तपासाच्या दृष्टीने विचार केला जात आहे.JआलीI न्यायालयाचा आदेशही ठरला निष्प्रभ ?कौटुंबिक वादातून जीवाला धोका निर्माण झाल्याचा आरोप करत हेमंत हेमाडे आणि त्यांची पत्नी योगिता यांनी कौटुंबिक न्यायालयात धाव घेतली होती. २० एप्रिल २०२६ रोजी न्यायालयाने संबंधित व्यक्तींना हेमाडे यांच्या घरापासून १०० मीटरच्या परिसरात येण्यास मनाई केली होती. मात्र, हा आदेश असतानाही २७ आणि २८ एप्रिल तसेच १८ मे रोजी घराजवळ येऊन शिवीगाळ केल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच २० आणि २३ मे रोजी वाहनांवर अंडी, कांदे आणि बटाटे फेकण्यात आल्याचेही फिर्यादीत नमूद आहे. या घटनांसंदर्भातील सीसीटीव्ही फुटेज आणि मेसेजचे स्क्रीनशॉट पेनड्राइव्हद्वारे पोलिसांकडे सादर केल्याचे सांगण्यात आले आहे. पुनर्विवाहानंतर मुलांकडून विरोध ?हेमाडे यांच्या पत्नी योगिता यांनी २० नोव्हेंबर रोजी गंगापूर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, ऑक्टोबर २०२१ मध्ये नोंदणीकृत पुनर्विवाह केल्यानंतर मुलगा यश आणि मुलगी प्रियंका यांच्याकडून विरोध सुरू झाला. त्यानंतर कुटुंबातील मालमत्तेवरील हक्क सोडण्यासाठी तसेच न्यायालयात सुरू असलेले दावे आणि प्रकरणे मागे घेण्यासाठी दबाव टाकला जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. न्यायालयीन सुनावणीला हजर राहिल्यास तीच शेवटची तारीख ठरेल, अशा स्वरूपाच्या धमक्या दिल्याचाही गंभीर आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या सततच्या मानसिक दबावामुळे हेमाडे अस्वस्थ आणि हतबल झाले होते, असे तक्रारीत म्हटले आहे.आत्महत्येप्रकरणी तपासाचा फोकस वाढलाहेमंत हेमाडे यांनी डोक्यात गोळी झाडून आत्महत्या केल्याची घटना समोर आल्यानंतर पोलिसांनी तपासाला वेग दिला. याप्रकरणी यश हेमाडे आणि त्याचा सासरा मल्लिकार्जुन उमदी यांना अटक करण्यात आली आहे. दोघांची पोलीस कोठडी संपल्यानंतर त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले होते. सुनावली आहे.



दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संपादकिय

एका महामानवाचे विचार, संघर्ष आणि आजच्या भारतासमोरील वास्तव!

एका व्यक्तीचा संघर्ष, संपूर्ण समाजाच्या परिवर्तनाचा!

भारतीय इतिहासाच्या पानांवर अनेक महान व्यक्तिमत्त्वांची नावे सुवर्णाक्षरांनी लिहिली गेली आहेत. मात्र काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात, ज्यांचे कार्य केवळ एका काळापुरते मर्यादित राहत नाही, तर त्यांच्या विचारांचा प्रकाश अनेक पिढ्यांना दिशा देत राहतो. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे असेच एक महान व्यक्तिमत्त्व. त्यांनी केवळ स्वतःच्या आयुष्यातील संघर्षावर मात केली नाही, तर शतकानुशतके अन्याय, विषमता आणि सामाजिक भेदभाव सहन करणाऱ्या लाखो लोकांना स्वाभिमानाने जगण्याचा मार्ग दाखवला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेताच डोळ्यांसमोर उभे राहते ते ज्ञानाचे प्रतीक, हातात भारतीय संविधान आणि चेहऱ्यावर आत्मविश्वास असलेले एक महान व्यक्तिमत्त्व. मात्र या प्रतिमेमागे किती संघर्ष, किती अपमान, किती अडचणी आणि किती अथक परिश्रम दडलेले आहेत, याचा विचार प्रत्येक भारतीयाने केला पाहिजे. बाबासाहेबांचे जीवन म्हणजे केवळ एका व्यक्तीची यशोगाथा नाही; तो सामाजिक परिवर्तनाचा, शिक्षणाच्या सामर्थ्याचा, समानतेच्या लढ्याचा आणि मानवी प्रतिष्ठेच्या अधिकाराचा इतिहास आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून ज्ञानाच्या शिखरावर पोहोचलेले! डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मध्य प्रदेशातील महू येथे झाला. त्यांचे पूर्ण नाव भीमराव रामजी आंबेडकर. त्या काळात भारतीय समाजात जातिभेद आणि अस्पृश्यतेची प्रथा खोलवर रुजलेली होती. समाजातील वंचित घटकांना शिक्षण, पाणी, सार्वजनिक ठिकाणे आणि सामाजिक प्रतिष्ठा यांसारख्या मूलभूत. अशा परिस्थितीत बाबासाहेबांना लहानपणापासूनच सामाजिक भेदभावाचा सामना करावा लागला. शाळेत शिकताना त्यांना अनेक अपमानास्पद अनुभव आले. मात्र त्यांनी परिस्थितीपुढे हार मानली नाही. शिक्षण हेच परिवर्तनाचे सर्वात मोठे शस्त्र आहे, याची जाणीव त्यांनाअत्यंत जिद्दीने आणि परिश्रमाने त्यांनी शिक्षणाची वाट चालत ठेवली. मुंबईतील एल्फिन्स्टन महाविद्यालयातून उच्च शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात आणि इंग्लंडमधील लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये उच्च शिक्षण घेतले. कायदा, अर्थशास्त्र, राजकारण, समाजशास्त्र आणि इतिहास अशा विविध विषयांचा त्यांनी सखोल अभ्यास केला. त्यांचे शैक्षणिक कर्तृत्व हे केवळ वैयक्तिक यश नव्हते. ज्या समाजाला शिक्षणापासून दूर ठेवले गेले, त्या समाजातील मुलांनीही ज्ञानाच्या बळावर जगात सर्वोच्च स्थान मिळवू शकते, हा विश्वास त्यांनी. आजही विद्यार्थ्यांसाठी बाबासाहेबांचे जीवन एक मोठा संदेश देते. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी शिक्षण, मेहनत आणि आत्मविश्वास यांच्या बळावर यश मिळवता येते. सामाजिक अन्यायाविरुद्ध उभा राहिलेला संघर्ष! बाबासाहेबांनी शिक्षण पूर्ण केल्यानंतर केवळ स्वतःचे आयुष्य घडवण्यावर समाधान मानले नाही. त्यांनी समाजातील विषमता आणि अस्पृश्यतेविरुद्ध लढा उभारला. समाजातील प्रत्येक व्यक्तीला समान अधिकार आणि सन्मान मिळाला पाहिजे, ही त्यांची भूमिका. १९२४ मध्ये त्यांनी 'बहिष्कृत हितकारिणी सभा' स्थापन केली. शिक्षणाचा प्रसार, सामाजिक जागृती आणि वंचित घटकांच्या उन्नतीसाठी या संस्थेने महत्त्वपूर्ण कार्य केले. १९२७ मधील महाड चवदार तळे सत्याग्रह हा त्यांच्या सामाजिक आंदोलनातील ऐतिहासिक टप्पा ठरला. सार्वजनिक पाणवठ्यांवर सर्वांना समान अधिकार असावा, या मागणीसाठी त्यांनी संघर्ष केला. पाणी पिण्यासारखा मूलभूत अधिकारही जातिभेदाच्या भिंतीमुळे नाकारला जात होता, ही त्या काळातील सामाजिक परिस्थितीची गंभीरता दर्शवणारी बाब होती. बाबासाहेबांचा लढा केवळ पाण्यासाठी नव्हता. तो मानवी प्रतिष्ठेसाठी होता. माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळावा, . नाशिक येथील काळाराम मंदिर प्रवेश आंदोलनानेही सामाजिक समतेच्या प्रश्नाला व्यापक स्वरूप दिले. धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रात समान अधिकार मिळाले पाहिजेत, ही भूमिका त्यांनी ठामपणे. या सर्व आंदोलनांतून एक गोष्ट स्पष्ट होते की, बाबासाहेबांना केवळ कायदेशीर समानता नको होती;

महिलांवरील अत्याचार, बदलती सामाजिक मानसिकता आणि स्त्रीच्या सन्मानासाठी समाजाने आता जागे होण्याची गरज!



आज भारत महासत्ता बनण्याचे स्वप्न पाहत आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण, उद्योग, क्रीडा, संरक्षण आणि अंतराळ संशोधन अशा प्रत्येक क्षेत्रात देश नवनवीन यश संपादन करत आहे. भारतीय महिला आज विमान उडवत आहेत, सैन्यात सेवा बजावत आहेत, देशाचे नेतृत्व करत आहेत, उद्योग उभारत आहेत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे नाव उज्ज्वल करत आहेत. एकेकाळी घराच्या चार भिंतींपुरती मर्यादित समजली जाणारी स्त्री आज आकाशाला गवसणी घालत आहे. मात्र या प्रगतीच्या झगमगाटामागे एक कटू वास्तव दडलेले आहे. आजही अनेक महिलांना घराबाहेर पडताना सुरक्षिततेची चिंता वाटते. रात्री प्रवास करताना भीती वाटते. कामाच्या ठिकाणी अपमान सहन करावा लागतो. काहींना घरातच मानसिक आणि शारीरिक छळाचा सामना करावा लागतो. मुलगी जन्माला आल्यापासून ते वृद्धापकाळापर्यंत स्त्रीला अनेक प्रकारच्या सामाजिक अडचणींचा सामना करावा ो. मग प्रश्न असा निर्माण होतो की, चंद्रावर पोहोचणाऱ्या देशातील स्त्रीला स्वतःच्या शहरात, गावात किंवा घरात सुरक्षितपणे जगण्याची हमी आपण का देऊ शकत नाही?

२५ नोव्हेंबर हा दिवस जगभरात महिलांवरील हिंसाचार निर्मूलनासाठी आंतरराष्ट्रीय दिवस म्हणून पाळला जातो. महिलांवरील हिंसाचार रोखणे, त्यांच्या अधिकारांबाबत जागृती करणे आणि पीडित महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे हा या दिवसामागील मुख्य उद्देश आहे. हा दिवस केवळ दिनविशेष म्हणून साजरा करण्याचा नसून समाजाच्या मानसिकतेचा आरसा पाहण्याचा दिवसेस्त्री म्हणजे केवळ नातं नाही, तर समाजाचा मजबूत र! ई, बहीण, मुलगी, पत्नी, मैत्रीण, शिक्षिका, अधिकारी, डॉक्टर, शेतकरी, कामगार अशा कितीतरी भूमिका स्त्री पार पाडत असते. प्रत्येक कुटुंबाच्या उभारणीत तिचा मोठा वाटा असतो. ती मुलांना संस्कार देते, कुटुंबाला एकत्र ठेवते आणि संकटाच्या काळात धैर्याने उभी . तात राबणारी महिला असो, घरकाम करून संसार चालवणारी असो किंवा मोठ्या पदावर काम करणारी अधिकारी असो, प्रत्येक स्त्रीचे योगदान महत्त्वाचे आहे. मात्र अनेकदा तिच्या मेहनतीची दखल घेतली जात नाही. घरातील कामाला काम मानले जात नाही. तिच्या स्वप्नांना दुय्यम स्थान दिले जाते. निर्णय घेण्याचा अधिकार असूनही तिला स्वतःचे मत मांडण्याची संधी मिळत नाही. स्त्रीला देवी मानणारा समाज प्रत्यक्ष आयुष्यात तिच्या सन्मानाचा विचार करतो का, हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे. स्त्रीचा सन्मान केवळ सण-समारंभात तिचे पूजन करून होत नाही. तिचे विचार ऐकणे, तिच्या निर्णयांचा आदर करणे, तिला शिक्षण आणि रोजगाराची संधी देणे आणि तिच्या स्वातंत्र्याला मान्यता देणे यातून खरा सन्मान व्यक्त होतो. घराच्या चार भिंतींमागे दडलेला! महिलांवरील अत्याचार म्हटले की अनेकांना रस्त्यावरील छेडछाड, विनयभंग किंवा बलात्कारासारख्या गंभीर गुन्ह्यांची आठवण होते. परंतु महिलांवरील हिंसाचाराचे स्वरूप त्यापेक्षा अधिक व्यापक . काही महिलांना घरात सतत अपमानास्पद बोलणे ऐकावे लागते. काहींना पैशांसाठी त्रास दिला जातो. काही महिलांवर हुंड्यासाठी दबाव टाकला जातो. काहींच्या शिक्षणावर आणि नोकरीवर बंदी घातली जाते. तर काहींना स्वतःच्या आयुष्याचे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्यही दिले. नेकदा कौटुंबिक हिंसाचार बाहेरच्या जगाला दिसतच नाही. घरातील प्रतिष्ठा, मुलांचे भविष्य, नातेसंबंध आणि समाजाची भीती यामुळे महिला अनेक वर्षे अन्याय सहन करतात. एखाद्या महिलेला मारहाण करणे हाच हिंसाचार नाही. सतत अपमान करणे, धमकावणे, मानसिक दबाव आणणे, आर्थिक स्वातंत्र्य हिरावून घेणे आणि जबरदस्तीने निर्णय लादणे हेदेखील हिंसाचाराचे प्रकार आपल्या आसपास अशा घटना घडत असतील, तर त्याकडे कौटुंबिक बाब म्हणून दुर्लक्ष करणे चुकीचे आहे. पीडित महिलेला मदत करणे आणि तिला योग्य मार्गदर्शन मिळवून देणे ही समाजाची जबाबदारी मुलगी जन्माला येते तेव्हापासूनच सुरू होणारा समाजातील स्त्री-पुरुष समानतेचा विचार करताना मुलींच्या जन्मापासून सुरुवात करावी लागेल. आजही काही कुटुंबांमध्ये मुलगा झाला तर आनंदोत्सव साजरा केला जातो, तर मुलगी झाली तर निराशा व्यक्त केली जाते. ही मानसिकता बदलल्याशिवाय समाजातील खऱ्या अर्थाने समानता निर्माण होणार नाही. मुलाला चांगल्या शाळेत पाठवायचे, त्याच्या शिक्षणासाठी खर्च करायचा आणि मुलीला घरकाम शिकवायचे, असा भेदभाव काही ठिकाणी आजही दिसून येतो. मुलाला स्वतःचे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य असते, तर मुलीला प्रत्येक गोष्टीसाठी परवानगी घ्यावी लागते. मुलगी शिकली तर ती स्वतःच्या पायावर उभी राहू शकते. तिला आर्थिक स्वातंत्र्य मिळते. स्वतःच्या अधिकारांची जाणीव होते. त्यामुळे मुलींच्या शिक्षणाकडे केवळ कुटुंबाची जबाबदारी म्हणून पाहता कामा नये. ती समाजाच्या विकासाची पायाभरणीमुलगी आणि मुलगा या दोघांनाही समान संधी मिळाली, तरच देशाची प्रगती सर्वसमावेशक होऊ शकते. सोशल मीडियाचे नवे आव्हान : डिजिटल जगातही सुरक्षितता ही आज मोबाईल प्रत्येकाच्या हातात आहे. इंटरनेटमुळे शिक्षण, व्यवसाय, माहिती आणि संवादाचे नवे मार्ग खुले झाले आहेत. महिलाही सोशल मीडियाचा वापर करून आपले विचार मांडत आहेत, व्यवसाय करत आहेत आणि जगाशी जोडल्या जात आहेत. मात्र याच डिजिटल माध्यमांचा गैरवापर करून महिलांना त्रास देण्याचे प्रकारही समोर येतात. बनावट सोशल मीडिया खाती तयार करणे, अश्लील संदेश पाठवणे, परवानगीशिवाय फोटो प्रसारित करणे, मॉर्फ केलेले फोटो वापरून बदनामी करणे, ऑनलाइन धमक्या देणे आणि सतत पाठलाग करणे अशा घटनांमुळे महिलांना मानसिक त्रास सहन करावा लागतो. काही वेळा सोशल मीडियावर एखाद्या महिलेने स्वतःचे मत मांडले तरी तिला अपमानास्पद भाषेचा सामना करावा लागतो. मतभिन्नता असू शकते; परंतु मतभिन्नतेच्या नावाखाली एखाद्याचा अपमान करण्याचा अधिकार कोणालाही नाही. ंजिटल माध्यमांवरील छळ हा विनोद किंवा किरकोळ प्रकार समजून दुर्लक्षित करता कामा नये. अशा वेळी संबंधित संदेश, स्क्रीनशॉट आणि इतर पुरावे सुरक्षित ठेवून सायबर गुन्हे विभागाकडे तक्रार करता येते. राष्ट्रीय सायबर गुन्हे नोंदणी पोर्टलवरही तक्रार नोंदवता येते. ंटरनेट वापरण्याचे स्वातंत्र्य जितके महत्त्वाचे आहे, तितकीच डिजिटल जगातील जबाबदारीही यदे आहेत, पण त्यांची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक! भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला समानतेचा अधिकार दिला आहे. संविधानातील कलम १४ समानतेचा अधिकार देते, तर कलम १५ धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थानाच्या आधारावर भेदभाव करण्यास प्रतिबंध करते. कलम २१ जीवन आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचे संरक्षण ते. हिलांच्या संरक्षणासाठी देशात अनेक महत्त्वाचे कायदे अस्तित्वात आहेत. १. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ – घरगुती हिंसाचारापासून महिलांना संरक्षण देणारा यदा. २. हुंडा प्रतिबंधक अधिनियम, १९६१ – हुंडा मागणे, देणे किंवा घेणे याविरोधात कायदेशीर. ३. कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ प्रतिबंध, मनाई आणि निवारण अधिनियम, २०१३ – कामाच्या ठिकाणी महिलांना सुरक्षित वातावरण मिळावे यासाठी कायदेशीर. ४. भारतीय न्याय संहिता, २०२३ – महिलांविरुद्धच्या विविध लैंगिक गुन्ह्यांसाठी दंडात्मक. मात्र केवळ कायदे तयार करून प्रश्न सुटत नाहीत. त्यांची योग्य अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. पीडित महिलेची तक्रार गांभीर्याने घेतली पाहिजे. तपास निष्पक्ष झाला पाहिजे. दोषींवर कायद्यानुसार कारवाई झाली पाहिजे आणि पीडितेला न्याय मिळवण्यासाठी आवश्यक मदत साय मार्गदर्शन आणि सरकारी योजनांची माहिती दिलीहिला तील असमानता आणि पदोन्नतीतील भेदभावाचा सामना करावा लागतो. कामाच्या ठिकाणी सुरक्षित आणि सन्मानजनक वातावरण असणे आवश्यक आहे. कायद्यानुसार आवश्यक अंतर्गत तक्रार समित्या स्थापन करणे, तक्रारींचे गोपनीयतेने निवारण करणे आणि महिलांना समान संधी देणे ही प्रत्येक संस्थेची. महिला कर्मचारी असल्यामुळे तिच्या क्षमतेवर शंका घेणे किंवा तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल अपमानास्पद टिप्पणी करणे ही चुकीची मानसिकता आहे. कामाच्या ठिकाणी महिलेला सन्मान मिळाला, तर तिच्या कार्यक्षमतेला अधिक वाव मिळतो आणि संस्थेचीही प्रगती. समाजमाध्यमांवर घोषणा नव्हे, प्रत्यक्ष कृती हवी! आज महिला सन्मानाबाबत सोशल मीडियावर अनेक संदेश, पोस्ट आणि शुभेच्छा दिल्या जातात. महिला दिन, मातृदिन किंवा विशेष दिनानिमित्त मोठमोठे कार्यक्रम होतात. मात्र दुसऱ्याच दिवशी महिलांविषयी अपमानास्पद बोलले जाते, छेडछाड केली जाते किंवा अन्यायाकडे दुर्लक्ष केले जाते. ग या शुभेच्छांचा आणि घोषणांचा उपयोग काय? महिला सन्मान हा वर्षातून एका दिवसाचा विषय नाही. तो प्रत्येक दिवसाच्या वागण्यातून दिसला पाहिजे. घरातील मुलीला निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य देणे, पत्नीच्या मतांचा आदर करणे, आईच्या श्रमांची दखल घेणे, महिला सहकाऱ्यांशी सन्मानाने वागणे आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे हीच खरी जनजागृती. समाज बदलण्याची सुरुवात सरकारपासूनच झाली पाहिजे असे नाही. ती आपल्या घरापासून, आपल्या विचारांपासून आणि आपल्या वागणुकीपासून होऊ शकते. १६ दिवसांची जागृती आणि वर्षभराची जबाबदारी! दरवर्षी २५ नोव्हेंबरपासून १० डिसेंबर या आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिनापर्यंत जगभरात महिलांवरील हिंसाचाराविरोधात १६ दिवसांची जनजागृती मोहीम राबवली. या मोहिमेत महिलांवरील हिंसाचाराचे विविध प्रकार, त्यांच्या अधिकारांची माहिती, पीडितांना मदत, कायद्यांची अंमलबजावणी आणि समाजातील मानसिकता बदलण्यावर भर दिला जातो. शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायती, नगरपालिका, सामाजिक संस्था आणि युवक मंडळांनी या काळात विशेष कार्यक्रम आयोजित केले पाहिजेत. महिलांच्या सुरक्षिततेविषयी चर्चा, कायदेविषयक मार्गदर्शन, स्वसंरक्षण प्रशिक्षण आणि जनजागृती रॅली यांचे आयोजन. परंतु १६ दिवसांनंतर हा विषय विसरून चालणार नाही. महिलांच्या सुरक्षिततेसाठी वर्षातील प्रत्येक दिवस महत्त्वाचा बदलाची सुरुवात आपल्या! समाज बदलण्यासाठी सर्वप्रथम आपल्या घरातील विचार बदलले पाहिजेत. मुलगा आणि मुलगी यांना समान वागणूक दिली पाहिजे. मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य दिले पाहिजे. त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी प्रोत्साहन दिले. घरातील कामे ही फक्त महिलांची जबाबदारी आहे, असा विचार बदलला पाहिजे. पुरुषांनीही घरकामात सहभागी झाले पाहिजे. मुलांना महिलांचा आदर करायला शिकवले पाहिजे. कुटुंबातील एखाद्या महिलेला अन्याय सहन करावा लागत असेल, तर तिच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे. तिला गप्प बसण्याचा सल्ला देण्याऐवजी योग्य मदत मिळवून दिली. समाजातील प्रत्येक नागरिकाने एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, स्त्रीच्या सुरक्षिततेचा प्रश्न हा केवळ महिलांचा प्रश्न नाही. तो संपूर्ण समाजाच्या संस्कृतीचा आणि सभ्यतेचा प्रश्न आहे. शेवटचा सवाल : स्त्रीला सुरक्षित जगण्याचा अधिकार कधी? आपण विकासाच्या गोष्टी करतो. देशाला महासत्ता बनवण्याचे स्वप्न पाहतो. जगातील मोठ्या अर्थव्यवस्थांमध्ये भारताचे स्थान उंचावण्याचा प्रयत्न करतो. पण या सर्व प्रगतीचा उपयोग काय, जर देशातील महिला अजूनही भीतीच्या वातावरणात जगत? एखादी मुलगी शिक्षणासाठी घराबाहेर पडताना तिच्या पालकांना काळजी वाटते. एखादी महिला नोकरीवरून घरी परतताना तिला सुरक्षिततेची चिंता असते. एखादी पीडित महिला तक्रार करण्यापूर्वी समाजाच्या प्रतिक्रियेचा विचार करते. हे चित्र बदलले पाहिजे. महिलांना सुरक्षितता देणे म्हणजे त्यांच्यावर बंधने लादणे नव्हे. उलट त्यांना निर्भयपणे जगण्याचे स्वातंत्र्य देणे होय. त्यांच्या कपड्यांवर, वेळेवर, शिक्षणावर किंवा निर्णयांवर प्रश्न उपस्थित करण्याऐवजी चुकीचे वर्तन करणाऱ्यांना जबाबदार धरले. स्त्रीला संरक्षणाची गरज आहे, पण त्याहून अधिक तिला सन्मान, समानता आणि स्वातंत्र्याची गरज आहे. `.

पहाटे दोन वाजता तक्रार, तासाभरात पोलिसांची कारवाई! धुळ्यात धर्मांतराच्या आरोपावरून गुन्हा

धुळे : प्रतिनिधी

धुळे शहरात अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवून धर्मांतरासाठी दबाव टाकल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या प्रकरणात मुलीला 20 हजार रुपये देण्याचे आमिष दाखवण्यात आल्याचा आरोप असून, नकार दिल्यानंतर तिला धमकावण्यात आल्याची माहिती आहे. एवढेच नव्हे तर मुलीच्या भावालाही मारहाण आणि धमकी दिल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. या प्रकरणी मुलीच्या आईने पोलिसांत तक्रार दाखल केली. त्यानंतर पोलिसांनी महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य अधिनियम 2026 अन्वये गुन्हा नोंदवून संबंधित आरोपीला अटक केल्याची माहिती समोर आली आहे. तक्रार मिळाल्यानंतर अवघ्या तासाभरात पोलिसांनी कारवाई केल्याचे सांगण्यात येत आहे. शेजारी राहणाऱ्या व्यक्तीकडून मुलीला त्रास दिल्याचा आरोपधुळे शहरातील एका परिसरात पीडित अल्पवयीन मुलगी आपल्या कुटुंबासह राहते. त्याच परिसरात राहणारा 38 वर्षीय व्यक्ती गेल्या काही दिवसांपासून मुलीचा पाठलाग करत असल्याचा आरोप आहे. संबंधित व्यक्ती मुलीवर लग्न करण्यासाठी दबाव टाकत होती. तसेच लग्न करण्यासाठी तिने धर्मांतर करावे, यासाठीही प्रयत्न केले जात असल्याची तक्रार कुटुंबीयांनी केली आहे.मुलीने या प्रस्तावाला नकार दिल्यानंतरही संबंधित व्यक्तीकडून तिचा पाठपुरावा सुरू असल्याचा आरोप आहे. यामुळे मुलगी आणि तिचे कुटुंबीय चिंतेत होते. कुटुंबीयांनी संबंधित व्यक्तीला समज देण्याचाही प्रयत्न केला होता. मात्र, त्यानंतरही हा प्रकार थांबला नसल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आल्याची माहिती आहे.20 हजार रुपये देण्याचे आमिष दाखवल्याचा आरोपा प्रकरणातील आणखी एक गंभीर बाब म्हणजे मुलीला 20 हजार रुपये देण्याचे आमिष दाखवण्यात आल्याचा आरोप आहे. लग्न आणि धर्मांतरासाठी तिला पैशांचे प्रलोभन दिले जात असल्याचे कुटुंबीयांचे म्हणणे आहे. मुलीने या गोष्टींना विरोध केला असतानाही संबंधित व्यक्तीकडून दबाव टाकला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.त्री अंगणात भांडी घासत असताना धमकीतक्रारीनुसार, रात्रीच्या वेळी मुलगी घराच्या अंगणात भांडी घासत होती. त्यावेळी संबंधित व्यक्तीने तिला धमकी दिल्याचा आरोप आहे. पुन्हा गल्लीत दिसल्यास उचलून नेण्याची धमकी देण्यात आल्याचे सांगितले जात आहे. या घटनेमुळे मुलगी घाबरली असून,



कुटुंबीयांनीही या प्रकाराची गंभीर दखल घेतली.यानंतर संबंधित व्यक्तीच्या बहिणीकडून मुलीच्या भावाला धमकी देण्यात आल्याचा आरोप आहे. भावाला मारहाण झाल्याची बाबही कुटुंबीयांनी तक्रारीत मांडल्याची माहिती आहे. या सगळ्या प्रकारानंतर कुटुंबीयांनी पोलिसांकडे धाव घेतलीपहाटे दोन वाजता पोलिसांत तक्रारया प्रकरणी मुलीच्या आईने पहाटेच्या सुमारास पोलिसांकडे तक्रार दाखल केली. तक्रारीमध्ये मुलीला लग्नासाठी दबाव टाकणे, धर्मांतरासाठी प्रवृत्त करणे, पैशांचे आमिष दाखवणे आणि धमकी देणे अशा गंभीर आरोपांचा समावेश असल्याची माहिती आहे.तक्रार प्राप्त झाल्यानंतर पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवली. तक्रार दाखल झाल्यानंतर अवघ्या तासाभरात संबंधित आरोपीला ताब्यात घेऊन अटक करण्यात आली. या प्रकरणी महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य अधिनियम 2026 अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे.िय आहे महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य अधिनियम 2026?महाराष्ट्र शासनाने बेकायदेशीर धर्मांतर रोखण्यासाठी महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य अधिनियम 2026 लागू केला आहे. या कायद्यानुसार फसवणूक, धमकी, बळजबरी, आमिष किंवा अनुचित प्रभावाचा वापर करून एखाद्या व्यक्तीचे धर्मांतर घडवून आणणे किंवा तसा प्रयत्न करणे हा दंडनीय गुन्हा आहे.या कायद्यातील कलम 3 मध्ये बेकायदेशीर धर्मांतरास प्रतिबंध करण्यात आला आहे. तर कलम 9 मध्ये त्यासाठी शिक्षेची तरतूद आहे. विशेष म्हणजे, अल्पवयीन व्यक्तीच्या संदर्भात अशा प्रकारचा गुन्हा घडल्यास अधिक कठोर शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. अल्पवयीन व्यक्तीशी संबंधित प्रकरणात दोष सिद्ध झाल्यास सात वर्षांपर्यंत कारावास आणि पाच लाख रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो.या कायद्यानुसार अशा स्वरूपाचे गुन्हे दखलपात्र आणि अजामीनपात्र आहेत. मात्र, संबंधित आरोपीला शिक्षा होणे हे न्यायालयीन प्रक्रियेत आरोप सिद्ध होण्यावर अवलंबून आहे. धुळे प्रकरणामुळे कायद्याची पुन्हा चर्चाधुळे शहरातील या घटनेमुळे महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य अधिनियम 2026 पुन्हा चर्चेत आला आहे. विशेषतः अल्पवयीन मुलीशी संबंधित आरोप असल्याने प्रकरणाचे गांभीर्य वाढले आहे. तक्रारीनंतर पोलिसांनी तातडीने कारवाई केल्याची माहिती समोर आली आहे.दरम्यान, या प्रकरणातील आरोपांची सत्यता, संबंधित व्यक्तीची भूमिका आणि घटनेशी संबंधित इतर बाबींचा तपास पोलिसांकडून केला जात आहे. मुलगी अल्पवयीन असल्याने तिची ओळख गोपनीय ठेवणे महत्त्वाचे आहे. पोलिसांच्या तपासातून या प्रकरणातील पुढील तपशील स्पष्ट होणार आहेत.

मंत्रिमंडळाचे मोठे निर्णय! 42 लाख शेतकऱ्यांना मोफत धान्य,



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार, २५ नोव्हेंबर २०२६ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत शेतकरी, विद्यार्थी, कामगार आणि सर्वसामान्य नागरिकांच्या हिताचे अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. अनेक सुधारणांना मंत्रिमंडळाने हिरवा कंदील दिला. मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णय पुढीलप्रमाणे : शेतकऱ्यांना मोफत धान्य राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेतील दारिद्र्यरेषेखालील, परंतु डीबीटी योजनेत समाविष्ट नसलेल्या ३३ जिल्ह्यांतील ४२ लाख ३० हजार ७८३ शेतकऱ्यांना पुढील तीन महिने पाच किलो मोफत धान्य मिळणार आहे. यामध्ये माणशी तीन किलो तांदूळ आणि दोन किलो गहू या प्रमाणात धान्य दिले जाणार आहे. नर्मदा-तापी वळण योजनेला मंजुरी नंदूरबार जिल्ह्यातील नर्मदा-तापी वळण योजनेसाठी ५ हजार ५४८ कोटी रुपयांच्या तरतुदीला मान्यता देण्यात आली. या योजनेत सहा वळण बंधाऱ्यांचे नियोजन आहे. यामाध्यमातून परिसरातील सुमारे २६ हजार ५२६ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ होणार असून ११.५० मेगावॅट वीज निर्मिती होणार आहे. आर्थिक फसवणुकीवर जलद कारवाई आर्थिक फसवणूक करणाऱ्या संस्थांच्या मालमत्ता जप्तीची प्रक्रिया जलद होणार आहे. त्यासाठी स्वतंत्र एमपीआयडी न्यायाधिकरण स्थापन करण्याबाबत आणि नव्वद दिवसांच्या आत प्रकरण निकाली काढण्याची कालमर्यादा ठरवण्याबाबत महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंबंधाचे संरक्षण अधिनियमानमध्ये सुधारणा करण्यास मंजुरी देण्यात आली.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संमिश्र वार्ता

अवघ्या 53 चेंडूंमध्ये 204 धावा आणि 28 षटकार



दोहा : प्रतिनिधी

येथे सुरू असलेल्या एसीसी रायझिंग स्टार्स आशिया कप 2026 मध्ये भारताच्या युवा फलंदाज वैभव सूर्यवंशीने संयुक्त अरब अमिराती विरुद्धच्या सामन्यात 53 चेंडूंमध्ये 204 धावांची तुफानी खेळी करत लिस्ट A क्रिकेटचे सर्व विक्रम मोडीत काढले आहेत. वैभवने अवघ्या 28 चेंडूंमध्ये (6.3 षटकांत) आपले शतक पूर्ण केले. यासह त्याने ऑस्ट्रेलियाच्या जेक फ्रेझर-मॅकगर्कने 2023 मध्ये नोंदवलेला 29 चेंडूंतील शतकाचा विक्रम मागे टाकत लिस्ट A क्रिकेटमधील सर्वात जलद शतकाचा नवा विक्रम रचला.या युवा खेळाडूचा तडाखा इथेच थांबला नाही; त्याने 40 चेंडूंमध्ये 150 धावांचा टप्पा ओलांडला. गेल्या वर्षी बिहार कडून खेळताना अरुणाचल प्रदेश विरुद्ध त्याने 59 चेंडूंमध्ये 150 धावा केल्या होत्या, तो स्वतःचाच विक्रम त्याने 19 चेंडूंनी सुधारलासर्वात जलद द्विशतकानंतर वैभव सूर्यवंशीचे नवे टार्गेट; आता मोडणार 'हे' दोन त्याने द्विशतक पूर्ण केले. याआधीचा विक्रम न्यूझीलंडच्या चॅड बोव्सच्या नावावर होता, ज्याने फोर्ड ट्रॉफीमध्ये कॅन्टरबरी कडून खेळताना ओटागो विरुद्ध 103 चेंडूंमध्ये द्विशतक झळकावले होते. वैभवने हा विक्रम निम्म्याहून अधिक वेगाने मागे टाकला.या ऐतिहासिक खेळीदरम्यान वैभवने 7 चौकार आणि तब्बल 28 षटकार लगावले. लिस्ट A क्रिकेटच्या एका डावात एखाद्या फलंदाजाने मारलेले हे सर्वाधिक षटकार आहेत. याआधी 2018 मध्ये डार्सी शॉर्टने एका डावात 23 षटकार मारण्याचा विक्रम केला होता, कोरले होते.

मेरठ हॉटेल प्रकरणातील फरार आरोपीला अटक

मेरठ : प्रतिनिधी



उत्तर प्रदेशातील मेरठ येथील चर्चेत असलेल्या हॉटेल प्रकरणात पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. फरार आरोपी सलमान (वय 29) याला लोहिया नगर पोलिसांनी अटक केली आहे. अटकेच्या वेळी झालेल्या कारवाईदरम्यान तो जखमी झाला. त्याच्यावर एका महिलेला हॉटेलमध्ये ओलीस ठेवणे, तिच्यावर बलात्काराचा प्रयत्न करणे आणि लग्नासाठी दबाव टाकल्याचा आरोप आहे. पोलिसांना पाहताच गोळीबार केलापोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नरहेडा गावाजवळ बांधकाम सुरू असलेल्या भुयारी मार्गाजवळ सलमानला घेरण्यात आले. यावेळी त्याने पोलिसांच्या दिशेने गोळीबार केल्याचा आरोप आहे. पोलिसांनी घेराव घातल्यानंतर त्याने पुलावर चढून पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, तो खाली पडल्याने त्याच्या उजव्या पायाला आणि डाव्या हाताला दुखापत झाली. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन उपचारासाठी पी.एल. शर्मा जिल्हा रुग्णालयात दाखल केले. त्याच्याकडून एक बेकायदेशीर .315 बोअरचे पिस्तूल, एक जिवंत काडतूस आणि एक वापरलेले काडतूस जप्त करण्यात आले आहे.महिलेचे अपहरण केल्याचाही आरोपया प्रकरणातील तक्रारीनुसार, सलमानने एका महिलेला हॉटेलमध्ये ओलीस ठेवले होते. तिच्यावर बलात्काराचा प्रयत्न करून लग्नासाठी दबाव टाकल्याचा आरोप आहे. महिला त्याच्या तावडीतून सुटल्यानंतर त्याने तिला रस्त्यावर मारहाण केली आणि तिचे अपहरण केले, असेही सांगण्यात आले आहे. या घटनेचे काही दृश्य सीसीटीव्हीमध्ये कैद झाल्याचे वृत्त आहे.अटकेनंतरचा व्हिडिओ चर्चेतसलमानच्या अटकेनंतर समोर आलेल्या व्हिडिओमध्ये तो पोलिसांकडे माफी मागताना दिसत आहे. "साहेब, माझ्याकडून चूक झाी, कृपया मला माफ करा. मी पुन्हा असे करणार नाही," असे तो म्हणताना ऐकू येतो. पोलिस त्याला खांद्यावर उचलून नेत असल्याचेही व्हिडिओमध्ये दिसते.आरोपीविरोधात अनेक गुन्हे दाखलपोलिसांच्या प्रसिद्धीपत्रकानुसार, 25 नोव्हेंबर 2026 रोजी सदर बाजार पोलीस ठाण्यात बलात्काराचा प्रयत्न आणि अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल झाला होता. या प्रकरणात सलमान हवा असलेला आरोपी होता. तो मेरठमधील रोहता परिसराचा रहिवासी असून, त्याच्याविरोधात मेरठ आणि गाझियाबादमधील विविध पोलीस ठाण्यांत गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.या प्रकरणात पोलीस पुरावे गोळा करत असून पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.

अंगणवाडी सेविका-मदतनीसांना आता 2 हजारांपर्यंत प्रोत्साहन भत्ता; नोव्हेंबरपासून नवे निकष लागू



मुंबई : प्रतिनिधी

अंगणवाडीतील बालकांचे पोषण, आरोग्य आणि शिक्षणासाठी अविरत कार्यरत असणाऱ्या अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांना दरमहा देण्यात येणाऱ्या प्रोत्साहन भत्त्याच्या निकषात सुधारणा करण्यात आल्याचे महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले. राज्यातील अंगणवाडी सेविका आणि मदतनिसांच्या कामांना गती देण्यासाठी राज्य सरकारने कामगिरीवर आधारित प्रोत्साहन भत्ता योजनेत सुधारणा केली आहे. राज्यात एकूण 1,10,664 अंगणवाड्या असून 1,08,627 अंगणवाडी सेविका आणि 1,05,470 अंगणवाडी मदतनीस कार्यरत आहेत. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांचे गुणात्मक मूल्यमापन करून पात्र ठरणाऱ्याना दरमहा प्रोत्साहन भत्ता दिला जातो. या भत्त्याच्या निकषांमध्ये सर्वसमावेशकता, सुसूत्रता यावी तसेच अधिकाधिक सेविका आणि मदतनीस यासाठी पात्र ठराव्यात यासाठी निकषांमध्ये सुधारणा करण्याचा निर्णय महिला बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या अध्यक्षतेतील समितीने घेतला आहे.

'मुंबई पुस्तक महोत्सव' संवेदना आणि माणुसकीचा उत्सव - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई : प्रतिनिधी



कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) युगात तंत्रज्ञानाचा वेग वाढत असला, तरी मानवी संवेदना, प्रेम आणि भावभावना यांची जागा एआय घेऊ शकत नाही. माणसाला संवेदनशील बनवण्याबरोबरच विचार करण्यास प्रवृत्त करण्याचे काम पुस्तके करतात. त्यामुळे मुंबई पुस्तक महोत्सव हा संवेदना आणि माणुसकीचा महोत्सव आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी केले. मुंबई विद्यापीठाच्या कालिना परिसरात मुंबई पुस्तक महोत्सवाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले. यावेळी मुंबईत दरवर्षी पुस्तक महोत्सव आयोजित केला जाईल, अशी घोषणाही त्यांनी केली"समृद्ध समाजाची निर्मिती पुस्तकांमधून होते. समाजातील ज्ञानसंपदेचा विस्तार पुस्तकांनीच केला आहे. आजचे युग कृत्रिम बुद्धिमत्तेचे असले, तरी जीवनातील संवेदना, प्रेम आणि भावना एआयला कळत नाहीत. पुस्तके मात्र माणसाला संवेदनशील बनवतात आणि विचार करण्यास प्रवृत्त करतात. त्यामुळे हा महोत्सव माझ्यासाठी संवेदना आणि माणुसकीचा उत्सव आहे," असे फडणवीस म्हणाले. या वेळी सांस्कृतिक कार्यमंत्री आशीष शेलार, कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा, मुंबई महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे, पोलीस आयुक्त देवेन भारती, महापौर ऋतु तावडे, राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे अध्यक्ष मिलिंद मराठे, संचालक युवराज मलिक, मुख्य आयोजक अमित साटम, मुख्य संयोजक आचार्य पवन त्रिपाठी आणि मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी उपस्थित होते. फडणवीस यांच्या हस्ते श्वेता पांडा यांच्या 'थोड़ी मय', हिमांशु गुप्ता यांच्या 'मेंटल हेल्थ फॉर टीनएजर्स', पूजा राय यांच्या 'अमर पुराण' आणि अमृता बोहरा यांच्या 'वीर गाथा' या पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले."चित्रपट, बॉलिवूड आणि फॅशन फेस्टिव्हलच्या मालिकेत आता मुंबईचा स्वतःचा पुस्तक महोत्सवही आहे," असे मुख्य आयोजक अमित साटम यांनी सांगितले. महोत्सवाच्या पहिल्याच दिवशी तरुणांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावल्याबद्दल आचार्य पवन त्रिपाठी यांनी समाधान व्यक्त केले. या महोत्सवामुळे तरुण पिढीचा स्क्रीन टाइम कमी होऊन वाचनासाठीचा वेळ वाढेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.केंद्र सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या अंतर्गत राष्ट्रीय पुस्तक न्यास, भारत यांच्या वतीने आयोजित हा महोत्सव २९ नोव्हेंबरपर्यंत सुरू राहणार आहे. महाराष्ट्र शासन, मुंबई महानगरपालिका आणि मुंबई विद्यापीठ या महोत्सवाचे सहयोगी आहेत. महोत्सवात ६०० हून अधिक पुस्तकांचे स्टॉल उभारण्यात आले असून, विविध साहित्यप्रकारांतील आणि भाषांमधील पुस्तकांचा मोठा संग्रह वाचकांसाठी उपलब्ध आहे. महोत्सवाच्या पहिल्याच दिवशी सुमारे एक लाख पुस्तकप्रेमींनी भेट दिली. शाळा आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचीही मोठी उपस्थिती होती. बालकांसाठी आयोजित विविध उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी, २५ नोव्हेंबर रोजी उद्योगपती गौतम अदानी यांची विशेष उपस्थिती असणार आहे. महोत्सवाच्या कालावधीत १०० हून अधिक सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. साहित्यिक संवाद, लेखकांशी चर्चा, पुस्तक प्रकाशन, विविध विषयांवरील प्रदर्शने, बालकांसाठी उपक्रम आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचा त्यात समावेश आहे. सर्व वयोगटांमध्ये वाचनाची सवय विकसित करणे आणि पुस्तक संस्कृती अधिक बळकट करणे हा या महोत्सवाचा उद्देश आहे.या महोत्सवात दिल्लीचे राज्यपाल तरनजीत सिंह संधू, आचार्य प्रशांत, पॅरालिम्पिकपटू दीपा मलिक, ॲड. उज्ज्वल निकम, गीतकार मनोज मुंतशिर, चित्रपट दिग्दर्शक चंद्रप्रकाश द्विवेदी, अभिनेत्री व लेखिका शेफाली शाह, अंतराळवीर शुभांशु शुक्ल, अरुणा ढेरे, शशिकांत सावंत, मयूर शाह, राजीव श्रीखंडे, साहित्यिक विश्वास पाटील, शरणकुमार लिंबाळे, अश्विन सांघी, आनंद नीलकंठन, अक्षत गुप्ता, मेधा भास्करन, अंजुम चोप्रा, अंशुल चतुर्वेदी, एहसान वजीर, निकिता ठाकूर आणि प्रफुल्ल बिल्लौरे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर वक्ते सहभागी होणार आहेत.

नवीन लाल कांद्याची आवक वाढताच दर घसरले



येवला : प्रतिनिधी

नाशिक जिल्ह्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना पुन्हा एकदा मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे. येवला कृषी उत्पन्न बाजार समितीत नवीन लाल कांद्याची आवक सुरू होताच, कांद्याच्या बाजारभावात मोठी घसरण झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. मागील आठवड्याच्या तुलनेत कांद्याच्या दरात प्रतिक्विंटल ३०० ते ४०० रुपयांची घट झाली असल्याने शेतकरी वर्गात तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.मागील आठवड्यापर्यंत येवला बाजार समितीत कांद्याला प्रतिक्विंटल ४,००० ते ४,१०० रुपयांपर्यंत चांगला दर मिळत होता. मात्र, बाजारात नवीन लाल कांद्याची आवक सुरू होताच हे दर खाली आले आहेत. सध्या कांद्याला सरासरी ३,६०० ते ३,७०० रुपये प्रतिक्विंटल इतकाच बाजारभाव मिळत आहे. अचानक झालेल्या या दर घसरणीमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले आहे. केवळ येवलाच नाही, तर आशिया खंडातील सर्वात मोठी कांदा बाजारपेठ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीतही कांद्याचे भाव गडगडले आहेत. येथील बाजार समितीतही कांद्याची आवक वाढल्याने दरावर मोठा परिणाम झाला असून, शेतकऱ्यांच्या पदरात निराशा पडली आहे. यावर्षी आधीच अपुऱ्या पावसामुळे दुष्काळाचे सावट निर्माण झाले आहे. पाणीटंचाई आणि बदलत्या हवामानामुळे कांद्याच्या उत्पादनात आधीच मोठी घट झाली आहे.

त्यातच मशागत, बियाणे, खते आणि मजुरीचा खर्चही प्रचंड वाढला आहे. अशा कठीण परिस्थितीत पीक वाचवून बाजारात आणल्यानंतर आता भाव घसरल्याने शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे. उत्पादन खर्चही निघणे कठीण झाल्याने बळीराजा हवालदिल झाला आहे.

त्यामुळे सरकारने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन कांद्याला किमान उत्पादन खर्चावर आधारित अपेक्षित बाजारभाव मिळवून द्यावा, अशी आर्त मागणी कांदा उत्पादक शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

वसईत उघड्या गटाराने घेतला चिमुरड्याचा बळी

वसई (प्रतिनिधी) :



वसई पूर्वेतील वालीव परिसरात घरामागील उघड्या गटारात पडून अवघ्या दोन वर्षांच्या चिमुरड्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना गुरुवारी रात्री घडली. अंकुश शाहदेव तुरिया असे मृत चिमुरड्याचे नाव आहे. मुलगा गटारात पडल्याचे समजताच वडील शाहदेव तुरिया यांनी क्षणाचाही विलंब न करता गटारात उडी मारून त्याला बाहेर काढले. मात्र, गटारातील पाणी नाकातोंडात गेल्याने त्याची प्रकृती गंभीर झाली होती. तातडीने रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, उघड्या गटारांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. वालीव परिसरातील रहिवासी असलेले शाहदेव तुरिया (२७) हे गुरुवारी कामावरून घरी परतले होते. घरी आल्यानंतर ते जेवण करत असताना त्यांनी मुलगा अंकुशला घराबाहेर खेळण्यासाठी पाठवले होते. रात्री सुमारे ११.३५ वाजण्याच्या सुमारास परिसरात अचानक आरडाओरडा सुरू झाला. घरामागील गटारात अंकुश पडल्याचे नागरिकांनी शाहदेव यांना सांगितले.मुलगा गटारात पडल्याचे कळताच शाहदेव यांनी कोणताही विचार न करता गटारात उडी घेतली आणि अंकुशला बाहेर काढले. मात्र, तोपर्यंत गटारातील पाणी त्याच्या नाकातोंडात गेले होते. मुलाला वाचवण्यासाठी वडिलांनी तातडीने धाव घेतली, परंतु दुर्दैवाने त्यांचे प्रयत्न यशस्वी होऊ शकले नाहीत. अंकुशला तातडीने नालासोपारा पूर्वेतील नागिंदासपाडा येथील वसई-विरार महापालिकेच्या रुग्णालयात नेण्यात आले. तेथे डॉक्टरांनी तपासणी करून त्याला मृत घोषित केले. अवघ्या दोन वर्षांच्या मुलाचा अशा प्रकारे मृत्यू झाल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. दरम्यान,उघड्या गटारांमुळे नागरिकांच्या, विशेषतः लहान मुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. रहिवासी परिसरातील गटारे उघडी असल्यास अशा दुर्घटना टाळण्यासाठी संबंधित यंत्रणांनी तातडीने उपाययोजना करणे आवश्यक असल्याची भावना या घटनेनंतर व्यक्त होत आहे.

उरणमध्ये तेल निर्मिती प्रकल्पाला भीषण आग

उरण : प्रतिनिधी



महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील उरणजवळील वेश्वी गावात सोमवारी एका औद्योगिक गोदामाला भीषण आग लागल्याची धक्कादायक घटना घडली. 'प्लॅटिनम लॉजिस्टिक्स सोल्युशन इंडिया' (या कंपनीच्या गोदामात ही आग लागली असून, यामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.प्राथमिक माहितीनुसार, सोमवारी सकाळी 10 च्या सुमारास या प्रकल्पात आगीचा भडका उडाला. हे ठिकाण सोयाबीन तेल निर्मितीचे युनिट असल्याची माहिती समोर आली आहे. आग लागल्यानंतर ती अत्यंत वेगाने पसरली आणि काही वेळातच गोदामाचा मोठा भाग आगीच्या भक्ष्यस्थानी पडला. या घटनेचे समोर आलेले व्हिडिओ अत्यंत भीषण असून, आगीचे उंचच उंच लोळ आणि आकाशात पसरलेले काळ्या धुराचे दाट लोट लांबूनही स्पष्टपणे दिसत आहेत. गोदामात रसायनांचा साठा जळून खाकघटनास्थळावरील दृश्यांवरून आगीची तीव्रता किती भयानक आहे, याचा अंदाज येतो. गोदामात मोठ्या प्रमाणात साहित्य साठवून ठेवण्यात आले होते. प्राथमिक अहवालानुसार, या सुविधेमध्ये साठवलेल्या साहित्यात काही रसायनांचाही (Chemicals) समावेश होता, जे या आगीत पूर्णपणे जळून खाक झाले आहेत. मात्र, आतमध्ये नेमका कोणत्या प्रकारचा आणि किती प्रमाणात साठा होता, तसेच या आगीत नेमके किती आर्थिक नुकसान झाले आहे, याची अधिकृत पुष्टी अद्याप प्रशासनाकडून करण्यात आलेली नाही.सिडको अग्निशमन दल घटनास्थळी दाखलया भीषण आगीच्या घटनेची माहिती मिळताच शहर आणि औद्योगिक विकास महामंडळाच्या (CIDCO) अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. अग्निशमन दलाच्या गाड्यांकडून आग आटोक्यात आणण्यासाठी आणि ती आजूबाजूच्या परिसरात पसरू नये यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू करण्यात आले आहेत. ताज्या माहितीनुसार, घटनास्थळी आग विझवण्याची मोहीम युद्धपातळीवर सुरू आहे. या घटनेबाबत आणि अग्निशमन दलाच्या बचावकार्याबाबत अधिक तपशीलाची प्रतीक्षा आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संमिश्र वार्ता

चिपळूण हादरले! गोवळकोट रोड परिसरात भरदिवसा कोयत्याने हल्ला;



रत्नागिरी : प्रतिनिधी

रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण शहरात भरदिवसा कोयत्याने जीवघेणा हल्ला झाल्याची खळबळजनक घटना घडली आहे. शहरातील गजबजलेल्या गोवळकोट रोड परिसरात दोन गटांमध्ये जोरदार वाद होऊन त्याचे रूपांतर तुफान हाणामारीत झाले. या संघर्षादरम्यान एका तरुणावर कोयत्याने सपासप वार करण्यात आले. या हल्ल्यात संबंधित तरुण गंभीररीत्या जखमी झाला असून, त्याला तातडीने उपचारांसाठी शहरातील 'लाईफ केअर हॉस्पिटल'मध्ये दाखल करण्यात आले आहे. सध्या त्याच्यावर वैद्यकीय उपचार सुरू आहेत. कौटुंबिक वादातून हल्ला झाल्याचा प्राथमिक अंदाजया धक्कादायक प्रकारामागे नेमके काय कारण आहे, हे अद्याप पूर्णपणे स्पष्ट झालेले नाही. मात्र, प्राथमिक तपासात आणि स्थानिकांकडून मिळालेल्या माहितीनुसार, जुन्या कौटुंबिक वादातून हा प्रकार घडला असावा, असा संशय व्यक्त केला जात आहे. भरदिवसा घडलेल्या या हिंसक घटनेमुळे गोवळकोट रोड परिसरातील व्यापारी आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.नागरिकांचा संताप आणि पोलिसांची धावहल्ल्याची बातमी वाऱ्यासारखी पसरताच घटनास्थळी आणि रुग्णालयाबाहेर नागरिकांचा मोठा जमाव जमला. भरदिवसा अशा प्रकारे कोयत्याने हल्ला करणाऱ्या आरोपींना तात्काळ अटक करावी, या मागणीसाठी स्थानिक नागरिक आक्रमक झाले आहेत. घटनेची माहिती मिळताच चिपळूण पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. पोलीस या प्रकरणाचा सखोल तपास करत असून हल्लेखोरांचा शोध घेतला जात आहे.

मुंबई पुस्तक महोत्सवात गौतम अदानींची उपस्थिती! पुस्तकांतून शिकून राष्ट्रनिर्मितीत योगदान द्या, विद्यार्थ्यांना आवाहन

मुंबई : प्रतिनिधी



विद्यापीठ परिसरात आयोजित मुंबई पुस्तक महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी उद्योगपती गौतम अदानी यांनी उपस्थिती लावली. पुस्तक महोत्सवातील विद्यार्थ्यांची मोठी संख्या पाहून त्यांनी आनंद व्यक्त केला. वाचनसंस्कृती वाढविण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. पुस्तक महोत्सवात बोलताना गौतम अदानी यांनी पुस्तके ही ज्ञानाचा मोठा खजिना असल्याचे सांगितले. विद्यार्थी, मुले आणि नागरिकांनी पुस्तकांमधून शिकून आपल्या ज्ञानाचा उपयोग राष्ट्रनिर्मितीत करावा, असे आवाहन त्यांनी केले.मुंबई पुस्तक महोत्सवात विद्यार्थी, पुस्तकप्रेमी आणि नागरिकांची मोठी उपस्थिती पाहायला मिळत आहे.

विविध विषयांवरील पुस्तके, साहित्य, ज्ञानपर सामग्री आणि प्रकाशनांचा समृद्ध संग्रह या महोत्सवात उपलब्ध असल्याने वाचकांना आकर्षित करणारा हा उपक्रम ठरत आहे. मुंबई पुस्तक महोत्सवात 200 प्रकाशक सहभागी झाले असून, 600 हून अधिक स्टॉल्स उभारण्यात आले आहेत. विविध भाषांतील साहित्य, कथा, कादंबऱ्या, शैक्षणिक पुस्तके, इतिहास, विज्ञान, तंत्रज्ञान आणि इतर विषयांवरील पुस्तकांची विस्तृत श्रेणी येथे उपलब्ध आहे.

नॅशनल बुक ट्रस्टचे संचालक युवराज मलिक यांनी मुंबईकरांमध्ये वाचनसंस्कृतीला प्रोत्साहन देणे हा मुंबई पुस्तक महोत्सवाचा प्रमुख उद्देश असल्याचे सांगितले. विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांना साहित्याच्या विविध विश्वाशी जोडण्याचा प्रयत्न या महोत्सवातून केला जात आहे. मुंबई पुस्तक महोत्सवात 'पत्रकारिता जनतेचा आवाज' या विषयावर विशेष सत्र आयोजित करण्यात आले. भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते प्रेम शुक्ल यांच्याशी मीडिया व्यावसायिक देवता पाटील यांनी संवाद साधला.

पत्रकारितेच्या बदलत्या स्वरूपावर, तिच्या प्रभावावर आणि समाजातील भूमिकेवर यावेळी चर्चा झाली. विशेष चर्चासत्रात प्रेम शुक्ल यांनी गेल्या दीड दशकात पत्रकारिता अधिक प्रभावशाली आणि व्यापक झाल्याचे मत व्यक्त केले. पत्रकारितेच्या विविध आयामांचा विस्तार झाला असून, सामाजिक आणि राष्ट्रीय स्तरावरील महत्त्वपूर्ण निर्णयांवरही माध्यमांचा प्रभाव असल्याचे त्यांनी सांगितले.मुंबई विद्यापीठ परिसरात आयोजित सहा दिवसीय मुंबई पुस्तक महोत्सव 29 नोव्हेंबरपर्यंत सुरू राहणार आहे. पुस्तक प्रदर्शन, नामवंत लेखकांचे संवाद, संकल्पनाधारित प्रदर्शने आणि सांस्कृतिक कार्यक्रम हे महोत्सवाचे प्रमुख आकर्षण आहेत. पुस्तकप्रेमी, विद्यार्थी आणि नागरिकांसाठी प्रवेश पूर्णपणे विनामूल्य ठेवण्यात आला आहे

क्राइस्टचर्च कसोटीपूर्वी टीम इंडियाने सराव केला रद्द

भारत न्यूझीलंड यांच्यात दोन सामन्यांची कसोटी मालिका सुरू आहे. या मालिकेतील पहिला सामना अनिर्णित ठरला. त्यामुळे दुसरा आणि शेवटचा सामना निर्णायक ठरणार आहे. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप 2027 स्पर्धेच्या अंतिम फेरीत जागा मिळवण्यासाठी हा विजय महत्त्वाचा आहे. असं असताना भारतीय संघाकडून फार अपेक्षा आहेत. दुसरा कसोटी सामना क्राइस्टचर्च येथे खेळला जाणार आहे. हा सामना 27 नोव्हेंबरपासून सुरू होणार आहे. मात्र या सामन्यापूर्वी होणारा सराव रद्द करण्यात आला आहे. 25 नोव्हेंबरला होणारा सराव झाला नाही. त्यामुळे क्रीडाप्रेमींच्या भुवया उंचावल्या आहेत. इतका महत्त्वाचा सामना असताना त्यापूर्वी होणार सराव का रद्द केला? यामागे काही कारण आहे का? असे एक ना अनेक प्रश्न क्रीडाप्रेमींच्या मनात घर करून आहेत. तर या मागचं प्रमुख कारण म्हणजे खेळाडूंची रिकव्हरी... भारतीय संघ व्यवस्थापनाने खबरदारीचा उपाय म्हणून हा निर्णय घेतला आहे. जेणेकरून खेळाडू फिट अँड फाईन राहतील आणि दुसऱ्या कसोटीसाठी ताजेतवाने राहतील.आराम मिळावा म्हणून...भारत न्यूझीलंड मालिकेतील पहिला सामना पार पडल्यानंतर अवघ्या तीन दिवसांनी दुसरा कसोटी सामना होणार आहे. त्यामुळे खेळाडूंना आराम करण्यासाठी पुरेसा अवधी मिळालेला नाही. त्यात पहिला कसोटी सामना पाच दिवस खेळून काढला. भारतीय गोलंदाजांनी चौथ्या आणि पाचव्या दिवशी गोलंदाजी केली. त्यामुळे खेळाडू खूपच थकले होते. त्यात भारतीय संघ वेलिंग्टनहून क्राइस्टचर्च येथे पोहोचला आहे. त्यामुळे शारिरिक आणि मानसिक थकवा आहे.थकवा आणि किरकोळ दुखापतींवर उपाय म्हणून भारतीय संघाने सराव टाळला. दुसरीकडे, भारतीय संघाने सराव टाळला असला तरी न्यूझीलंडने संधी साधली. 25 नोव्हेंबर रोजी न्यूझीलंडच्या खेळाडूंनी क्राइस्टचर्च येथे सराव केला. या सराव सत्रादरम्यान मॅट हेनरी याने पत्रकार परिषद घेतली.

न्यूझीलंडच्या खेळाडूंनीही वेलिंग्टन मैदानात पाच दिवस घालवले. न्यूझीलंडचे खेळाडूही थकले असतील, यात काही शंका नाही. पण त्यांनी सराव केला आणि टीम इंडियाने का नाही? अशीही चर्चा क्रीडावर्तुळात रंगली आहे. कसोटी मालिका सध्या बरोबरीत आहे. वेलिंग्टन कसोटी अनिर्णित राहिल्यानंतर भारतीय संघासाठी क्राइस्टचर्च कसोटीतील विजय निर्णायक आहे. हा विजय केवळ मालिका जिंकण्यासाठीच नव्हे, तर डब्ल्यूटीसी अंतिम फेरीत पोहोचण्याच्या भारताच्या आशांसाठीही महत्त्वाचा आहे.

प्राथमिक कृषी पतसंस्थांना मिळणार 'आपले सरकार सेवा केंद्रा'चा दर्जा

मुंबई : प्रतितनिधी



राज्यातील ग्रामीण भागातील नागरिकांना शासकीय आणि डिजिटल सेवा गावातच उपलब्ध व्हाव्यात, यासाठी सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. राज्यातील प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्था (PACS) यांना आता 'आपले सरकार सेवा केंद्र' म्हणून मान्यता देण्यात येणार आहे. इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाचे मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी ही माहिती दिली. गावातच मिळणार विविध शासकीय सेवाप्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्था ग्रामीण अर्थव्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावतात. या संस्थांच्या माध्यमातून यापूर्वीच डिजिटल पेमेंट, विमा नोंदणी, पेन्शन योजना, वीज व इतर उपयोगिता बिल भरणे, तिकीट सेवा आणि कृषी सल्ला अशा सुविधा दिल्या जात आहेत.या संस्थांना 'आपले सरकार सेवा केंद्रा'चा दर्जा मिळाल्यामुळे ग्रामीण नागरिकांना विविध शासकीय सेवा गावातच मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. त्यामुळे छोट्या-मोठ्या सरकारी कामांसाठी शहर किंवा तालुक्याच्या ठिकाणी जाण्याची गरज कमी होईल. केंद्र सरकारच्या निर्देशानुसार निर्णयकेंद्र सरकारच्या सहकार मंत्रालयाने PACS संस्थांना राज्य सरकारच्या सेवा वितरणासाठी अधिकृत संस्था म्हणून नियुक्त करण्याबाबत राज्यांना सूचना दिल्या होत्या. त्यानुसार मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या माहिती तंत्रज्ञानविषयक उच्चाधिकार समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.केंद्र सुरू करण्यासाठी 10 हजार रुपये अनामत रक्कम'आपले सरकार सेवा केंद्र' सुरू करण्यासाठी पात्र PACS संस्थांना 10 हजार रुपये अनामत रक्कम भरावी लागणार आहे. तसेच केंद्र चालवण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध असणे बंधनकारक आहे. यामध्ये स्वतंत्र जागा, संगणक, प्रिंटर, बायोमेट्रिक उपकरणे, इंटरनेट, वीजपुरवठा, बॅकअप सुविधा, फर्निचर आणि नागरिकांसाठी प्रतीक्षा व्यवस्था यांचा समावेश आहे.संबंधित संस्थांना शासनाच्या नियमांचे पालन करण्याबाबत लेखी हमी द्यावी लागेल. सेवा शुल्क, केंद्राची ओळख, माहितीची सुरक्षा, नोंदवही आणि नागरिकांना सेवा देण्याच्या प्रक्रियेबाबतच्या नियमांचे पालन करणेही आवश्यक असेल. जिल्हाधिकाऱ्यांकडे करावा लागणार अर्जया केंद्राचा दर्जा मिळवण्यासाठी पात्र PACS संस्थांनी संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडे अर्ज सादर करावा लागेल. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून संस्थेची माहिती आणि अनामत रकमेची पडताळणी केली जाईल. त्यानंतर प्रस्ताव महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाकडे (महाआयटी) पाठवण्यात येईल. पुढील प्रक्रियेनंतर संबंधित संस्थांना लॉगिनची माहिती उपलब्ध करून दिली जाईल.एका क्षेत्रासाठी एकापेक्षा अधिक पात्र अर्ज आल्यास, लागू असलेल्या पात्रता आणि निवड निकषांनुसार एका संस्थेला प्राधान्य देण्याचा निर्णय सहकार विभाग घेईल.या निर्णयामुळे ग्रामीण भागातील सहकारी संस्थांचे डिजिटल सक्षमीकरण होण्यास मदत होणार असून, गावपातळीवर शासकीय सेवा उपलब्ध होण्याचे जाळे अधिक व्यापक होण्याची अपेक्षा आहे.

तब्बल १९,९३४ कोटींची तरतूद; देशांतर्गत उत्पादनाला मिळणार मोठी चालना

नवी दिल्ली : प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी (PM narendra Modi) यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत देशातील पायाभूत सुविधा, यंत्रसामग्री उत्पादन आणि टपाल यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी पाच महत्त्वपूर्ण प्रस्तावांना मान्यता देण्यात आली आहे. या सर्व प्रकल्पांसाठी केंद्र सरकार एकूण १९,९३४ कोटी रुपये खर्च करणार आहे. या निर्णयांमध्ये आसाममधील सिलचर येथे नवीन ग्रीनफील्ड विमानतळ उभारणे, तामिळनाडूतील कामराजार बंदराचा विस्तार करून तेथे दुसरे कंटेनर टर्मिनल बांधणे आणि बांधकाम क्षेत्रातील उपकरणांचे देशांतर्गत उत्पादन वाढवण्यासाठी ११,००० कोटी रुपयांची विशेष योजना राबवणे यांचा समावेश आहे.

1. बांधकाम उपकरणांच्या देशांतर्गत उत्पादनासाठी ११,००० कोटींची योजनादेशात बांधकाम आणि पायाभूत प्रकल्पांसाठी लागणाऱ्या मोठ्या यंत्रसामग्रीचे (CIE) उत्पादन वाढवण्यासाठी मंत्रिमंडळाने ११,००० कोटी रुपयांच्या योजनेला मंजुरी दिली आहे. २०२६-२७ ते २०३३-३४ या आठ वर्षांत ही योजना राबवली जाईल. माहिती व प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की, भारत या क्षेत्रात जगातील तिसरी मोठी बाजारपेठ असून २०२४-२५ मध्ये तिची उलाढाल सुमारे ९७,००० कोटी रुपये होती. सध्या या क्षेत्रातील ४५ टक्के उपकरणे परदेशातून आयात करावी लागतात. ही आयात थांबवून देशातच आधुनिक यंत्रे तयार करण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. या योजनेतून बोगदा खोदणारी यंत्रे (टनेल बोरिंग मशीन), ऑफ-हायवे ट्रक, एक्स्कॅव्हेटर, क्रेन, लोडर, पायलिंग रिग आणि ड्रिलिंग मशीन या सात प्रमुख उपकरणांच्या निर्मितीला चालना दिली जाईल. रस्ते, पूल आणि बोगद्यांच्या कामात या यंत्रांचा मोठा वापर होतो.2. कामराजार बंदरावर उभारले जाणार दुसरे कंटेनर टर्मिनलतामिळनाडूतील कामराजार पोर्ट लिमिटेड (KPL) येथे दुसरे कंटेनर टर्मिनल विकसित करण्याच्या प्रस्तावालाही मंजुरी मिळाली आहे. सुमारे ४,२८८ कोटी रुपये खर्चून हा प्रकल्प सार्वजनिक-खाजगी भागीदारी (PPP) तत्त्वावर उभारला जाईल. १११ एकर क्षेत्रावर साकारल्या जाणाऱ्या या टर्मिनलची वार्षिक क्षमता २० लाख कंटेनर्स (TEUs) हाताळण्याची असेल. येथील जहाजे उभी राहण्याची जागा ९०० मीटर लांब आणि ३० मीटर रुंद असणार आहे, ज्यामुळे ४०० मीटरपर्यंत लांब आणि २४,३४६ कंटेनर्स वाहून नेणारी मोठी जहाजे येथे सहज येऊ शकतील. ४० वर्षांच्या कराराच्या या प्रकल्पामुळे बंदराची कार्यक्षमता वाढून सागरी व्यापाराला मोठी गती मिळणार आहे.3. आसाममधील सिलचर येथे नवीन ग्रीनफील्ड विमानतळाची उभारणीआसाममधील सिलचर येथील डोलू भागात नवीन ग्रीनफील्ड विमानतळ बांधण्यास मंत्रिमंडळाने हिरवा कंदील दाखवला आहे. २,०१४ कोटी रुपयांच्या या प्रकल्पाचा संपूर्ण खर्च भारतीय विमानतळ प्राधिकरण (AAI) स्वतःच्या निधीतून करणार आहे. या नवीन विमानतळावर गर्दीच्या वेळी एका तासात ८०० प्रवाशांची (४०० येणारे आणि ४०० जाणारे) वाहतूक हाताळता येईल, तर वार्षिक प्रवासी क्षमता १०.१ लाख असेल. सध्याचे सिलचर विमानतळ भारतीय वायुसेनेच्या ताब्यात असल्याने आणि तेथे जागा अपुरी असल्याने विस्तार शक्य नव्हता. नवीन विमानतळामुळे बराक व्हॅली आणि ईशान्य भारतातील हवाई वाहतूक सुधारून पर्यटन आणि स्थानिक व्यवसायाला चालना मिळेल.4. ग्रामीण डाकघरांच्या आधुनिकीकरणासाठी १,१४१ कोटींची तरतूदपुढील पाच वर्षांत देशातील टपाल कार्यालये अधिक आधुनिक करण्यासाठी सरकारने १,१४१ कोटी रुपये मंजूर केले आहेत. या निधीतून ग्रामीण भागातील , पत्रे आणि पार्सल पोहोचवणारी वाहतूक व्यवस्था (लॉजिस्टिक्स) मजबूत करणे आणि सरकारी योजनांचा लाभ थेट सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवणे यावर भर दिला जाईल.


॥ 12 राशींचे आजचे भविष्य ॥

1.	मेष	आजचा दिवस तुमच्यासाठी उत्साहवर्धक राहील. कामात यश मिळेल व मन प्रसन राहील.
2.	वृषभ	आर्थिक स्थिती मजबूत होईल. कुटुंबात आनंदांचे वातावरण राहील.
3.	मिथुन	नवीन संधी मिळण्याची शक्यता आहे. संवादातून कामे मार्गी लागतील.
4.	कर्क	आरोग्याची काळजी घ्या. खर्चावर नियंत्रण ठेवा, प्रवास टाळा.
5.	सिंह	मान-सन्मानात वाढ होईल. वरिष्ठांची कृपा लाभेल. धाडसी निर्णय फायदेशीर ठरेल.
6.	कन्या	शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रात प्रगती होईल. घरगुती कामे सुरळीत होतील.
7.	तुला	आर्थिक लाभाची संधी मिळेल. नातेसंबंध दृढ होतील.
8.	वृश्चिक	मनातल्या चिंता दूर होतील, गुंतवणुकीत सावधगिरी बाळगा.
9.	धनु	विद्यार्थ्यांसाठी दिवस उत्तम आहे. प्रवासातून लाभ होईल.
10.	मकर	कामाच्या ठिकाणी कौतुक होईल. आर्थिक प्रगतीसाठी हा काळ अनुकूल आहे.
11.	कुंभ	नवीन प्रकल्प हाती घेण्यास योग्य वेळ आहे. मित्रांचा सहवास लाभदायक ठरेल.
12.	मीन	भावनिक निर्णय टाळा. तब्येत सांभाळा. आध्यात्मिक क्रियेत मन गुंतवा.

शुभ दिवस... शुभ भविष्य...

पालघरमध्ये बिबट्याचा भीषण हल्ला! 65 वर्षीय महिला शेतमजुराचा मृत्यू

पालघर : प्रतिनिधी



पालघर जिल्ह्यात बिबट्याच्या हल्ल्याने पुन्हा एकदा भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. डहाणू तालुक्यातील मतेगाव येथे बिबट्याने 65 वर्षीय महिला शेतमजुरावर हल्ला करून तिचा जीव घेतला. तुळशी रामा सावर असे मृत महिलेचे नाव असून,त्या विक्रमगड तालुक्यातील सरशी गावातील रहिवासी होत्या. या घटनेनंतर संतप्त ग्रामस्थांनी वनविभागाकडे तातडीने बिबट्याला पकडण्याची मागणी केली आहे.कामावरून परतताना बिबट्याची झडपमिळालेल्या माहितीनुसार, 1 नोव्हेंबर रोजी संध्याकाळी सुमारे 7 वाजण्याच्या सुमारास तुळशी सावर या शेतातील काम आटोपून परतत होत्या. मतेगाव परिसरात दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक त्यांच्यावर झडप घातली. बिबट्याने त्यांच्या मानेवर हल्ला केल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. हल्ल्याचा आवाज ऐकून परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. मात्र, तोपर्यंत बिबट्या अंधाराचा फायदा घेत जवळच्या जंगलात पसार झाला होता. मृत महिलेचा मृतदेह शवविच्छेदनासाठी सरकारी रुग्णालयात पाठवण्यात आला असून, पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे..वनविभागाच्या कारवाईची ग्रामस्थांची मागणीया घटनेनंतर मतेगाव आणि आसपासच्या परिसरातील शेतकरी व शेतमजुरांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. बिबट्याला पकडण्यासाठी परिसरात तातडीने ट्रॅप कॅमेरे आणि पिंजरे लावण्यात यावेत, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. बिबट्याला लवकर पकडण्यात आले नाही, तर जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्याचा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे. शेतीच्या कामासाठी बाहेर पडणाऱ्या मजुरांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. एका महिन्यात दुसरी घटना; पालघरमध्ये चिंता वाढलीपालघर जिल्ह्यात यापूर्वी 9 ऑक्टोबर रोजी नवली परिसरातील भोगळे पाडा येथे 52 वर्षीय महिलेचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाल्याचे वृत्त समोर आले होते. त्यानंतर मतेगाव येथील घटनेमुळे मानव-बिबट्या संघर्षाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. जिल्ह्यात बिबट्याचा वावर वाढल्याच्या तक्रारी स्थानिकांकडून होत आहेत.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

काशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर-1 येथून प्रकाशित केले. संपादक : रोहित विकास पाटील email : hinduprakashvarta@gmail.com website : www.hinduprakashwarta.com PRGI No.: MHMAR/25/A2358 संपर्क क्र. : 7261999911